+ Finance File

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

**बैठक क्रमांक** : 179

**स्थळ** : Offline Meeting / Online Meeting App
(यश-ईन सभागृह, मुख्यालय, नाशिक)

**वार व दिनांक** : शनिवार दि. 30 **ऑक्टोबर** 2021

**वेळ** : **सकाळी** 11.30 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.179 (Offline Meeting App/Online) शनिवार दि. 30 ऑक्टोबर 2021 सकाळी 11.30 वाजता यश इंटरनॅशनल सभागृह विद्यापीठ मुख्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1.प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू | अध्यक्ष |
| 2. मा.प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | सदस्य |
| 3.मा.डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे | सदस्य |
| 4.मा.डॉ.संजय चोरडिया,पुणे | सदस्य |
| 5. मा. आ.श्री. सुहास कांदे,नाशिक | सदस्य |
| 6. मा.आ.श्रीमती सरोज आहिरे,नाशिक | सदस्य |
| 7. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 8. डॉ.दिनेश भोंडे, कुलसचिव | सचिव |
| 9. श्री.भटुप्रसाद पाटील, प्र.वित्त अधिकारी | निमंत्रित |

खालील सदस्य बैठकीस Online उपस्थित होते

| | |
|---|---|
| 10. प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | सदस्य |
| 11.श्री. डी.पी. नाठे,संचालक, तंत्रशिक्षण,मंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 12. मा.श्री.उदित सेठ, मुंबई | सदस्य |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 13. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली | सदस्य |
| 14. मा.श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य |
| 15. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 16. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 17. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 18. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 19. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

| क्र.(No.) | | तपशील (Details) |
|---|---|---|
| 179.1.0 | 179.1.1 | **स्वागत (Welcome)**<br>बैठकीच्या सुरूवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मा. कुलपती यांनी डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे, डॉ. सजय चोरडिया, पुणे, श्री.उदित सेठ, मुंबई यांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती केल्याबद्दल मा. कुलगुरू यांनी विद्यापीठाची शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. तसेच प्रा. महेंद्र लामा मा. आ. श्री. सुहास कांदे, मा. आ. श्रीमती सरोज आहिरे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. |

16/11

**विद्यापीठातील विविध बाबी व कार्यवाहींची माहीती देणे – मा.कुलगुरु**

To report the various matters & action taken - Hon'ble Vice Chancellor

मा. कुलगुरू यांनी बैठकीत विद्यापीठातील विविध बाबी व केलेल्या कार्यवाहीची पुढीलप्रमाणे माहिती दिली –

सध्या चालू असलेल्या नॅकच्या कामाबाबतची सद्यस्थितीची माहिती देण्यात आली व दोन रिपोर्ट नॅकला सादर करण्यात आले. सदर नॅकचे काम शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने चालू आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने नवीन एम.ए. आणि एम. एस्सी पदव्युत्तर या अभ्यासक्रमास मान्यता दिल्याची माहिती देण्यात आली. UGC च्या नियमाप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ भरण्यात येणार आहे. तसेच एन.पी.एस. आणि मेडिकल इन्शुरन्सचे काम पूर्ण झालेले असून प्रलंबित असलेल्या निवृत्तीवेतन प्रकरणांचे कामही पूर्ण झालेले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे Vaccinations चालू आहे. सदर माहिती ही विद्यापीठाच्या पोर्टलवरही टाकण्यात आलेली आहे. ***एक विद्यार्थी एक झाड*** ही संकल्पना राबविण्यात आली असून विद्यार्थी त्याचा अवलंब करीत आहेत.

राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे गट क आणि ड संवर्गातील पदांची बिंदूनामावली तपासण्यात आलेली आहे.

राज्य शासनाकडून रत्नागिरी, बारामती, ठाणे या ठिकाणी विद्यापीठाला भुखंड प्राप्त झाले आहेत. रत्नागिरी येथील बांधकामाचा आराखडा तयार झाला आहे.

विद्यापीठाने डिजीलॉकर पोर्टल साईटवर उपलब्ध करून दिलेले आहे. विद्यार्थी साईटवर जाऊन प्रमाणपत्र डाऊनलोड करू शकतात. तसेच ऑनलाईन मायग्रेशनचे कामकाज सूरू झाले आहे.

विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला असून 80% थकबाकीही अदा करण्यात आलेली आहे.

विद्यापीठातील नियमित, करारावरील, दैनंदिन वेतनावरील तसेच सुरक्षा कर्मचारी, शेतमजूर यांचे Covid Vaccination करून घेण्यात आले.

राज्य शासनाकडून आलेल्या सूचनानुसार विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे पुढील परीक्षेचे परिस्थितीनुरूप ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहे.

डॉ. जयदीप निकम यांनी विद्यापीठाचे वित्त अधिकारी पद भरण्यासंदर्भात मुद्दा मांडला असता मा. कुलगुरू यांनी सदर पद भरण्याबाबत लवकरात लवकर जाहिरात देण्यात येईल असे सांगितले.

याशिवाय खालील प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आले.

- सद्यस्थितीत विद्यापीठात कार्यरत असलेले शैक्षणिक समन्वयक यांच्या नियुक्तीस परिनियम क्र. 11 (2 of 1993) नुसार कुलगुरू आणि व्यवस्थापन मंडळ यांच्या अधिकारातील तीन वर्ष पूर्ण झालेले आहेत. त्यांना नॅकचे कामकाज सूरू असल्यामुळे मुदतवाढ देण्याबाबत प्रस्तावित केले.
- डॉ. दिनेश भोंडे, यांच्या कुलसचिव या पदावरील पुर्ननियुक्ती संदर्भात विद्यापीठ कायदा व परिनियमातील तरतुदीनुसार त्यांना एक वर्षाची पुर्ननियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर पुर्ननियुक्तीच्या अनुषंगाने व डॉ. दिनेश भोंडे हे शासकीय सेवेत असल्यामुळे शासनाने त्यांना एक वर्षाचा धारणाधिकार मंजूर केलेला आहे.

सदर विषय हा डॉ. दिनेश भोंडे यांच्या स्वत:च्या संदर्भात असल्यामुळे त्यांनी स्वत: सभागृहाबाहेर जाण्याची मा. कुलगुरू यांना विनंती केली व त्यांच्या परवानगीने सदर विषय सुरू असतांना ते सभागृहाबाहेर गेले होते.

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव - मा. कुलगुरू यांनी बैठकीत सादर केलेल्या विविध बाबी व कार्यवाहीवर व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी अभिनंदन करून प्रस्तावित केलेल्या वरील दोन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| 179.2.0 | 179.2.1 | **दि. 7 ऑगस्ट 2021 रोजी झालेल्या 178 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे (Online / Offline App) कार्यवृत्त वाचून कायम करणे**<br>To read and confirm the minutes of the 178th Board of Management meeting on 7th August2021<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - दि. 7 ऑगस्ट 2021 रोजी झालेल्या 178 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा (Online / Offline App) कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.** |
| | 179.2.2 | **दि. 7 ऑगस्ट 2021 रोजी झालेल्या 178 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील (Online / Offline App) झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>Action taken report on the 178th Board of Management meeting on 7th August 2021<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - दि. 25 मे 2021 रोजी झालेल्या 177 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील (Online) झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| 179.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय ( Discussion Items)** |
| | 179.3.1 | **श्री.कैलास शिंदे, यांच्या प्रकरणासंदर्भात विद्यापीठ कायद्यातील कलम ३१(१) Tribunal of Arbitration करिता व्यवस्थापन मंडळाने एका सदस्याचे नामनिर्देशन करणेबाबत**<br>To nominate a member of Arbitration Committee by the Board of Management.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - श्री. कैलास शिंदे यांच्या प्रकरणासंदर्भात विद्यापीठ कायद्यातील कलम ३१(१) Tribunal of Arbitration करिता श्री. एच. बी. पटेल, मुंबई (माजी सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन ) यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 179.3.2 | **विद्यापाठातील शिक्षकांसाठी करिअर एडवान्समेंट स्किम ( CAS ) संदर्भात – विषय तज्ज्ञ नेमणुकीबाबत**<br>Nomination of Subject Experts for CAS<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - शिक्षकांसाठी करिअर एडवान्समेंट स्किम ( CAS ) संदर्भात – विषय तज्ज्ञ नेमणुकीबाबत मा. कुलगुरू यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 179.3.3 | **नियोजन मंडळ बैठक दि.04.08.2021 चे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर**<br>To approve minutes of Planning Board meeting held on 04.08.2021<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - नियोजन मंडळ बैठक दि.04.08.2021 चे कार्यवृत्ताची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली.** |
| | 179.3.4 | **वित्त समिती बैठक दि.21 ऑक्टोबर 2021 चे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर**<br>To approve minutes of Finance Committee meeting held on 21st October 2021<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्त समितीच्या दि. 21 ऑक्टो. 2021 रोजी झालेल्या बैठकीतील कार्यवृत्तास व वित्त समितीने केलेल्या शिफारशींना मान्यता देण्यात आली. मात्र कार्यवृत्तातील खालील ठरावांमध्ये बदल सूचविण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**<br>❖ वित्त समितीच्या ठराव क्र. 18.3.7 मधील मानधनात सूचविलेली वाढ ही सर्व |

16/11

| | | |
|---|---|---|
| | | विद्याशाखांना लागू करण्यात यावी.<br>❖ सामुहिक वैद्यकीय ग्रुप विमा योजना करीता वित्त समितीने ठराव क्र. 18.3.8 करीता शिफारस केल्यानुसार वार्षिक विमा हप्त्यापोटी रु. 44,00,000 (चौरेचाळीस लाख फक्त) इतक्या रक्कमेस मान्यता देण्यात आली. तसेच विमा हप्त्यात वाढ झाल्यास विमा हप्त्याची वाढीव रक्कम व इतर अटी व शर्तीचे मंजूरीचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात आले.<br>❖ वित्त समितीने केलेल्या ठराव क्र. 18.3.10 नुसार केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. मात्र सानुग्रह अनुदानासाठी वित्तीय वर्षाऐवजी 01 ऑक्टो. ते 30 सप्टे.असा कालावधी विचारात घ्यावा.<br>❖ वित्त समितीच्या ठराव क्र. 18.3.17 मध्ये कालबाह्य झालेल्या धनाकर्ष (Demand Draft) बाबत संबंधित बँकेच्या विभागीय कार्यालयांना पत्र पाठवावे व त्याची प्रत रिझर्व बँक, मुंबई यांना पाठवून पाठपुरावा करावा.<br>❖ वित्त समिती ठराव क्र. 18.3.20 मधील शिफारशींबाबत खाली नमुद केलेल्या ठराव क्र. 179.3.5 नुसार कार्यवाही करण्यात यावी. |
| | 179.3.5 | **विद्यापीठाच्या वित्त समितीवर व्यवस्थापन मंडळाच्या दोन सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत (Statute No. 1 (1 of 1991)**<br>To nominates two members on Finance Committee<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठाच्या वित्त समितीवर व्यवस्थापन मंडळाचे दोन सदस्य म्हणून डॉ. अनिल कुलकर्णी व मा. आ. श्रीमती सरोज आहिरे यांचे नामनिर्देशन करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 179.3.6 | **विद्यापीठाच्या परिक्षामंडळावर व्यवस्थापन मंडळाच्या दोन सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत**<br>To nominates two members on Board of Examinations<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठाच्या परीक्षा मंडळावर व्यवस्थापन मंडळाच्या दोन सदस्याचे नामनिर्देशनाचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 179.3.7 | **विद्यापीठाच्या विद्वत परिषदेवर विद्यापीठातील संचालक (केंद्र /विभाग) यामधुन मा.कुलगुरु यांनी सुचविलेल्या तीन सदस्यांची नेमणुक करण्यास मान्यता देणेबाबत Statute No. 5 (3 of 1992)**<br>To approve & nominate three members on the Academic Council by recommendation of Vice Chancellor<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - सदर नामनिर्देशनाचे अधिकार मा. कुलगुरू यांना आहेत. त्यामुळे व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यतेचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 179.3.8 | **विद्यापीठाच्या नियोजन मंडळावर दोन सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत Statute No. 3 (1 of 1992)**<br>To appoint two members on Planning Board.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठाच्या नियोजन मंडळावर व्यवस्थापन मंडळाने दोन सदस्य म्हणून डॉ. संजय चोरडीया व मा. आ. श्री. सुहास कांदे यांचे नामनिर्देशन करण्यास मान्यता देण्यात आली..** |

16/11

| | | |
|---|---|---|
| | 179.3.9 | **करारावरील 17 कर्मचाऱ्यांच्याबाबत नियुक्त केलेल्या श्री.एच.बी.पटेल समितीचा अहवाल सादर करणेबाबत व निर्णयार्थ - To submit Shri.H.B.Patel committee report regarding 17 employees & take decision thereof.**<br>करारावरील 17 कर्मचाऱ्यांच्याबाबत नियुक्त केलेल्या श्री.एच.बी.पटेल समितीचा अहवाल सादर करणेबाबत व निर्णयार्थ<br>To submit Shri.H.B.Patel committee report regarding 17 employees & take decision thereof-<br>सदर ॲड. हमीद बी. पटेल, माजी सचिव, विधि व न्याय विभाग यांच्या समितीचा अहवाल सर्व उपस्थित सदस्यांना देण्यात आला व ऑनलाईन उपस्थित सदस्यांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात आला.<br>17 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या निवडप्रक्रियेच्या सुरूवातीपासून ते समितीच्या अहवालापर्यंत संपुर्ण घटनाक्रम मा. सदस्यांना विषयपत्रिकेसोबत पाठविण्यात आला होता. आणि सुरूवातीपासून ते अहवाल प्राप्त होईपर्यंतचा संपूर्ण घटनाक्रम वाचून दाखविला. त्यानंतर समितीचे सदस्य व व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी यांना समितीचा अहवाल बैठकीत विषद करण्याची विनंती केली.<br>डॉ.अनिल कुलकर्णी यांनी अहवाल उपस्थित सदस्यांना विषद केला, व त्यांनी पुढे सांगितले की,<br>"17 कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. 13 डिसे. 2019 च्या पत्राच्या अनुषंगाने प्रकरण तपासून अहवाल सादर करणेकामी विद्यापीठाने ॲड. एच.बी. पटेल यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. कुलकर्णी हे स्वत: सदर समितीत सदस्य होते.<br>समितीने यासंदर्भातील आणि इतर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचा, मा. न्या. पाटणकर यांचे मत, शासनाचे विविध पत्रे, 17 कर्मचाऱ्यांचे निवेदन, त्यांचे प्रतिनिधीनी प्रत्यक्ष मांडलेले म्हणणे, 17 कर्मचाखऱ्यांच्या संदर्भातील विविध पत्रव्यवहार, व्यवस्थापन मंडळाचे ठराव इ. कागदपत्रांचा अभ्यास केला.<br>मा. न्या. श्री. पाटणकर यांनी 17 कर्मचाऱ्यांसोबत चर्चा, विद्यापीठातील अधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने Back Door Entry असल्याचे मत दिले आहे.<br>परंतु 17 कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतांना नियमित कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी असलेल्या Ordinance No. 01 of 1991 नुसार निवडप्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यामुळे सदर नियुक्त्या ह्या Back Door Entry ने झालेल्या नाहीत"<br>" तसेच 17 कर्मचाऱ्यांबाबत निर्णय घ्यावयाचा अधिकार विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार व्यवस्थापन मंडळाचा असल्याने व्यवस्थापन मंडळाने याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे व त्याना सेवेत सामावून घेण्यास माझे अनुमोदन आहे." असे डॉ.अनिल कुलकर्णी यांनी सांगितले.<br>या अनुषंगाने कुलसचिव यांनी सांगितले की, 24 एप्रिल 2014 पर्यंत 17 कर्मचारी करारावर कार्यरत होते. त्यावेळी त्यांचे दर सहा महिन्यांनी कामाचे मुल्यमापन केले जात होते. त्यानुसार त्यांचे मूल्यमापन योग्य होते. या कर्मचाऱ्यांना 25 एप्रिल 2014 पासून करारावरील एकत्रित वेतनावरून दैनंदिन वेतनावर घेण्यात आले. आणि फेब्रु. 2015 पासून दैनंदिन वेतनावरील सेवेतून काढून टाकण्यात आले.<br>त्यावर मा. आ. सरोज आहिरे यांनी सांगितले की, जरी ते सेवेत नसले तरी त्यांचा तेंव्हापासून ते आजपर्यंत पाठपुरावा चालू आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय झाल्यामुळे करारावरील 17 कर्मचाऱ्यांचा माणुसकीच्या दृष्टीकोनातून विचार करण्यात यावा. |

16/11

व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. जयदीप निकम यांनी बैठकीत सांगितले की, कोर्टाने या कर्मचाऱ्यांचा GR रद्द केला होता तेव्हाच हा विषय संपायला पाहिजे होता. 2014 नंतर हे 17 कर्मचारी कार्यरत नाहीत. हे 17 कर्मचारी कोर्टातही गेले नाही, हे 17 कर्मचारी आले तर पदोन्नतीवर अन्याय होईल म्हणून शिपाई कर्मचारी कोर्टात गेले.

यावर मा. आ. सुहास कांदे यांनी सांगितले मा. न्यायालयाने GR रद्द केला नसून 17 कर्मचाऱ्यांबाबत नव्याने निर्णय घ्यावा असे न्यायालयाने शासनाला सूचित केले आहे. त्यानुसार शासनाने विधि व न्याय विभागाचा अभिप्राय घेतला. त्या अभिप्रायानुसार शासनाने 17 कर्मचाऱ्यांचा निर्णय घेण्याबाबत विद्यापीठास कळविले आहे. त्यांनी मा. कुलगुरू व कुलसचिव यांना सेवेत घ्यायचे किंवा नाही याबाबत मत विचारले असता, व्यवस्थापन मंडळ जो निर्णय घेईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

शासनाकडे 2013 मध्ये सहायकाची पदे मंजूरीच्या प्रस्तावात त्यावेळी करारावर कार्यरत असलेल्या 17 कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत कळविण्यात आले होते.

नंतर मा. आ. श्री. कांदे यांनी मा. कुलगुरूंना विचारले की, तुम्हाला कर्मचाऱ्यांची गरज आहे का ? यावर मा. कुलगुरू यांनी सांगितले की, विद्यापीठाला दैनंदिन वेतनावरील कर्मचाऱ्यांकडून काम करून घ्यावे लागते, यापूर्वी 2011 मध्ये व्यवस्थापन मंडळाच्या ठरावानुसार विद्यापीठास आवश्यकता असल्याने पदे मंजूरीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. आजही विद्यापीठास मनुष्यबळाची नितांत गरज आहे. मनुष्यबळाची विद्यापीठात व विभागीय केंद्रावर कमतरता असल्याने अत्यंत निकड आहे. त्यामुळे पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

त्यानंतर मा. आ. श्री. कांदे यांनी किमान माणुसकी व त्यांची सध्या झालेली हलाखीची आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती विचारात घ्यावी. त्यांनी त्यांचे मागील 07 वर्ष कोर्ट व सेवेत नियमित करण्यासाठी वाया घातले. त्यामुळे त्यांचे वयोधिक्य झाले. वरील बाबी विचारात घेऊन 17 कर्मचाऱ्यांना सेवेत घ्यावे अशी विनंती मा. कुलगुरूंना केली, मा. आ. श्रीमती सरोज आहिरे यांनी सदर कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्यास दुजोरा दिला. यापूर्वी विद्यापीठाच्या सेवेत घेतलेल्या करारावरील कर्मचाऱ्यांना पदे मंजूर झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर सेवेत सामावून घेण्यात आले. परंतु या 17 कर्मचाऱ्यांबाबत तसा न निर्णय झाल्याने Discrimination झाले असे बैठकीत निदर्शनास आणून दिले. व्यवस्थापन मंडळ सदस्य श्री. डी.पी. नाठे यांनी बैठकीत सांगितले की, विद्यापीठाला जर गरज असेल तर या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घ्यावयास हवे. कोणत्याही परिस्थितीत कोणाचेही शोषण व्हायला नको, न्यायाने विचार करून सेवेत घ्यायला पाहिजे म्हणून त्यांनी संमती दिली.

मा. कुलगुरू यांनी बैठकीत यावर अंतिम निर्णय काय घ्यावा याबाबत विचारणा केली. यावर मा. आ. श्री. कांदे व श्रीमती आहिरे यांनी सदर 17 कर्मचाऱ्यांना शक्य होईल तितक्या लवकर सेवेत घ्यावे. यांस सदस्यांनी अनुमती दिली.

सन 2013 मध्ये व्यवस्थापन मंडळ ठराव क्र.ए-100/13/41 नुसार 50 पदांची आवश्यकता विहित केली होती. सद्यस्थितीत विद्यापीठ व विभागीय केंद्रावर लागणाऱ्या एकुण सहायकांची आवश्यकता निर्धारित करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या 80 सहायकांच्या व्यतिरिक्त 45 अतिरिक्त सहायकांची विद्यापीठाला आवश्यकता आहे, त्यापैकी सरळसेवा आणि पदोन्नतीला नियमानुसार पदे राहतील.

सदर 17 कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घ्यावयाचे असल्यास सहायकाच्या सरळसेवेच्या कोट्यातील पदांवर 17 कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेता येईल.

पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांना निर्माण होणाऱ्या पदोन्नतीच्या कोट्यातील पदांवर पदोन्नती दिली जाईल. सरळसेवा व पदोन्नतीचा कोटा, आरक्षणाचे धोरण इ. प्रशासकीय बाबी तपासून कार्यवाही करता येईल. असे कुलसचिव यांनी बैठकीत सांगितले.

16/11

| | | |
|---|---|---|
| | | 17 कर्मचाऱ्यांच्या विषयावर सखोल चर्चा झाल्यानंतर सर्वानुमते खालील ठराव करण्यात आले.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -**<br><br>1. **विद्यापीठाला 2013 पासून सहायक पदांची आवश्यकता असल्यामुळे विद्यापीठाच्या कायद्यातील कलम 5 (xvi) अन्वये एस-8 या वेतनस्तरात सहायकाची 45 पदे निर्माण करण्यात येत आहेत.**<br><br>2. **करारावरील 17 कर्मचारी हे नियमित कर्मचाऱ्यासाठी असलेली निवडप्रक्रिया पूर्ण करून नियुक्त झालेले असल्याने पुन्हा निवडप्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे या प्रकरणावर सहानूभुतीपूर्वक विचार करून त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने, ठराव क्र. 179.3.9.1 नुसार निर्माण झालेल्या पदांवर त्यांच्या सेवा सहायक या पदावर नियमित करण्याचा ठराव करण्यात आला. हे कर्मचारी शैक्षणिकदृष्ट्या पात्र असल्यामुळे व करारावरील नियुक्तीच्या वेळी ते वयोमर्यादेची तसेच इतर अनुषंगिक पात्रतेची अट पूर्ण करीत होते. म्हणून या नियुक्त्या करतांना वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त सध्या लागू असलेल्या इतर अनुषंगिक बाबी पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात यावी. तथापि सदर नियुक्त्या करतांना पदोन्नती, सरळसेवा, आरक्षण कोटा, याचा विचार करण्यात यावा. पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांची पदोन्नतीच्या कोट्यातील पदांवर नियमानुसार पदोन्नती करण्यात यावी.**<br><br>3. **करारावरील 17 कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेतांना या सेवा त्यांच्या रूजू होण्याच्या तारखेपासून नवीन नियुक्त्या राहतील. ते करारावरील सेवेच्या आधारे कोणतेही मागील वेतन व त्या अनुषंगाने कुठल्याही लाभास पात्र राहणार नाहीत.** |

16/11

| | | |
|---|---|---|
| 179.4.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 179.4.1 | **विद्यापीठ कर्मचारी श्री.दिपक प्रल्हाद जाधव यांचे वैद्यकीय उपचाराचे देयक रु.4,77,365/-चे अदा केल्याची बाब कार्योत्तर मान्यतेसाठी सादर**<br>To post facto sanction medical bill of Shri.Deepak Jadhav Rs. 4,77.365/- Only<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठ कर्मचारी श्री. प्रल्हाद जाधव यांचे वैद्यकीय उपचाराचे देयक रु. 4,77,365 अदा करण्याबाबत मा. कुलगुरू यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| 179.5.0 | | **मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय**<br>Any other items with the permission of the Chair |
| | 179.5.1 | **उस्मानानाबाद येथे विद्यापीठाच्या केंद्र व उपकेंद्राबाबत**<br>मा. आ. कैलास बाळासाहेब घाडगे-पाटील यांचे दि. 07.10.2021 चे विद्यापीठाचे उपकेंद्र व स्पर्धापरीक्षा व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याबाबतचे पत्र<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - उस्मानाबाद येथे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी द्विसदस्यीय समिती स्थापन करण्यात यावी व सदर समितीने अहवाल सादर करावा. समिती स्थापन करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात आले.** |
| | 179.5.2 | **आरसीआयच्या सामंजस्य करारानुसार आवश्यक पदे भरण्याबाबत.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – Rehabilitations Council of India, New Delhi (RCI) यांच्या नियमानुसार पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| 179.6.0 | | **खालील मुद्यांबाबत व्यवस्थापन मंडळ बैठकीत चर्चा करण्यात आली.** |
| | 179.6.1 | व्यवस्थापन मंडळ सदस्य श्री. उदित शेठ यांनी विद्यापीठाचा पुढील तीन वर्षाचा नियोजन आराखडा, आर्थिक अंदाजपत्रक तयार करावे, तसेच संशोधन केंद्र, योगा, स्पोर्ट इ. सुविधा विद्यापीठात उपलब्ध करून देण्याबाबत विचार करावा अशी सूचना मांडली. |
| | 179.6.2 | विद्यापीठात कार्यरत असलेले काही कर्मचारी विद्यापीठाची बदनामी करीत असलेबाबतची माहिती मा. कुलगुरू यांनी बैठकीत दिली - विद्यापीठातील काही शिपाई, कर्मचारी, अधिकारी तसेच प्रभारी संचालक पदावरील अधिकारी हे विद्यापीठाकडे कोणतेही लेखी न करता, कुलसचिव तसेच कुलगुरूंची तक्रार व्यवस्थापन मंडळ सदस्यांजवळ परस्पर करतात व ईमेलही पाठवितात. परस्पर न्यायालयात दावा दाखल करतात. विहित पध्दत न अवलंबविता न्यायालयाची नोटीस बजावतात. त्यामुळे शिपाई कर्मचारी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची ही बाब कार्यालयीन शिस्त न पाळणारी असून शिस्तभंग करणारी आहे. यावर मा. आ. सुहास कांदे यांनी सर्व उपस्थित सदस्यांसमोर सांगितले की, असे गैरकृत्य करणारे, शिस्तभंग करणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी, त्यास आमचे सर्व सदस्यांचे कुलगुरूंना समर्थन राहील. |
| | 179.6.3 | बी.एस्सी. (Agriculture) या शिक्षणक्रमाला ICAR, New Delhi यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम असल्याने व मुक्त विद्यापीठास व्यावसायिक अभ्यासक्रम चालविण्याची UGC कडून मान्यता काढण्यात आलेली असल्याने विद्यापीठाने सदर बी.एस्सी. (Agri.) हा शिक्षणक्रम बंद केलेला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. देशात बी.एस्सी. (Agri.) हा एकमेव अभ्यासक्रम या विद्यापीठातर्फे मराठी भाषेत 1994 पासून राज्यभर चालविण्यात येत होता. या शिक्षणक्रमाचा आजतागायत जवळपास तीन लाख विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे. त्यामुळे त्यास अनेक शेतकऱ्यांची मुले प्रवेश घेऊन आत्मसात केलेले प्रगत तंत्रज्ञान आपल्या शेतीत वापरत होते. मात्र हा अभ्यासक्रम बंद केल्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे पर्यायाने शेतीचे नुकसान झालेले आहे. यापूर्वी Government of Maharashtra, Law and Judiciary Department Maharashtra act |

…/11

| | | |
|---|---|---|
| | | No.. XLI of 1983, The Maharashtra Agricultural University (Krishi Vidyapeeth) Act 1983 (As modified up to 27 September, 2006) CHAPTER-II 3/9 अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना सदरील कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी देण्यास मान्यता आहे. UGC ची मान्यता नसल्यास केंद्रीय नोकऱ्यांमध्ये संधी मिळणार नाही मात्र महाराष्ट्र सरकार राज्यात नोकरी देऊ शकते. अशी माहिती मा. आ. श्री. कांदे यांनी बैठकीत दिली.<br>**उच्च शिक्षण हा राज्य व केंद्र यांच्या सामाईक सूचीतील विषय असल्यामुळे राज्य सरकारने या शिक्षणक्रमास मान्यता देऊन आवश्यक ती कार्यवाही करून तो चालविण्याची मुभा या विद्यापीठास द्यावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचा ठराव मांडण्यात आला.**<br>**सदरील ठरावास मान्यता देण्यात आली.** |

बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहिर केले.

सचिव
**व्यवस्थापन मंडळ**

अध्यक्ष 16/11/202
**व्यवस्थापन मंडळ**